महाराष्ट्र राज्य

# वनविभाग



# खाजगी जमिनीवरील अनुसूचित वृक्ष तोडणे व उत्पादित मालाची वाहतूक करण्याबाबत नियमन

www.mahaforest.gov.in

Scanned by CamScanner

# वनविभाग, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र राज्यातील खाजगी (मालकी) जमिनीवरील अनुसूचित वृक्ष तोडण्याबाबत व उत्पादित मालाची वाहतूक करण्याबाबत नियमन.

## अ) महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम, १९६४

राज्यातील नगरपालिका व महानगर पालिका हद्दीबाहेरील सर्व प्रकारच्या खाजगी (मालकी) जमिनीवरील अनुसूचित वृक्ष तोडण्यासाठी या अधिनियमाअंतर्गत परवानगी देण्यात येते. यासाठी मालकी हक्का विषयीचे आवश्यक कागदपत्र अर्जासह स्थानिक वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) यांचे कडे सादर करणे आवश्यक असते.

## अनुसूचितील वृक्ष प्रजाती (मनाई वृक्ष)

१. हिरडा *(Terminalia chebula)*

२. साग *(Tectona grandis)*

३. महुआ, म्होवरा किंवा महु *(Madhuka latiafolia)*

४. ---- (वगळलेले)

५. आंबा *(Mangifera indica)*

६. ---- (वगळलेले)

७. खैर *(Acacia catechu)*

८. चंदन *(Santalum album)*

९. बिजा *(Pterocarpus marsupium)*

१०. हळदू *(Adina cordifolia)*

११. तिवस *(Ougeinia dalbergioides)*

१२. ऐन *(Terminalia tomentosa)*

१३. किंजळ किंवा किंडळ *(Terminalia peniculata)*

१४. अंजन *(Hardwickia binata)*

१५. जांभूळ *(Syzygium cumini)*

१६. खारफुटी *(Mangrove spp)*

Scanned by CamScanner

## केवळ सिंधुदुर्ग जिल्ह्याकरिता जास्तीच्या अनुसूचित प्रजाती

शासन अधिसूचना क्रमांक टिआरएस–१०९७/प्र.क्र. २४४/फ–६, महसुल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक ४ ऑक्टोंबर १९९९ अन्वये अनुसूचित वृक्षांच्या यादीत केवळ सिंधुदुर्ग जिल्ह्याकरिता खालील प्रजातींचा सुद्धा समावेश करण्यात आलेला आहे.

१७. शिशम *(Dalbergia latifolia)*

१८. शिवण *(Gmelina arboria)*

१९. नाना *(Lagrstroemia lanceolata)*

२०. बेहळा *(Terminalia belerica)*

२१. काजरा *(Strychnes nuxvomica)*

२२. भेडस *(Eugenia zeylanica)*

२३. पांढरा ऐन *(Terminalia arjuna)*

२४. ---- (वगळलेले)

शासन अधिसूचना क्रमांक टिआरएस–०३/२००८/प्र.क्र.५८/फ–६, महसुल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक १७ जून २००८ अन्वये खालील प्रजातीचा अनुसूचित वृक्षांच्या यादीमध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

२५. अमृता (नरक्या) *(Nothopodytes nimmoniana/Nothopodytes foetida/Mappia foetida)*

शासन अधिसूचना क्रमांक संकीर्ण–०१/२००७/प्र.क्र.८/फ–६, महसुल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक ५ मे २०११ अन्वये उपरोक्त अनुसूची मधील अनुक्रमांक ४) चिंच, ६) फणस व अनुक्रमांक २४) काजू या प्रजातींना यादीतून वगळण्यात आलेले आहे. तसेच अनुक्रमांक ५) वरील आंबा या प्रजातीपैकी कलमी आंबा या प्रजातीस वगळण्यात आले आहे.

## ब) उत्पादित मालासाठी वाहतूक परवाना

भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ४१ अन्वये मनाई व बिगर मनाई वृक्ष प्रजातींच्या तोडी पासून उत्पादित होणाऱ्या मालास वाहतूक परवाना घेणे बंधनकारक आहे. तथापि, महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी काढलेल्या अधिसुचनेद्वारे खालील प्रजातींच्या उत्पादित मालाचे वाहतूक परवान्याच्या बंधनातून सूट दिलेली आहे.

Scanned by CamScanner

| अ.क्र. | शासन निर्णय/अधिसुचना व पत्र क्र. | वाहतुक परवान्याचे बंधनातुन सुट देण्यात आलेल्या वृक्षाची नांवे | सुट असलेले क्षेत्र |
|---|---|---|---|
| १. | अधिसुचना टिआरएस-१०९०/ प्र.क्र.३२/९०(iii)/फ-६, दि. ५ मार्च १९९० | निलगीरी *(Eucalyptus)* | संपूर्ण महाराष्ट्र राज्य. |
| २. | अधिसुचना टिआरएस-१०९०/ प्र.क्र.३२/९०(i)/फ-६, दि. २१ जून १९९० | बाभूळ *(Acacia nilotica)* | संपूर्ण महाराष्ट्र राज्य |
| ३. | | सुबाभूळ *(Leucaena leucocephala)* | संपूर्ण महाराष्ट्र राज्य |
| ४. | | प्रोसोफिस *(Prosopis juliflora)* | संपूर्ण महाराष्ट्र राज्य |
| ५. | अधिसुचना टिआरएस-१०९५/ प्र.क्र.३४/फ-६, दि. २३ ऑक्टोंबर १९९७ | अशोक (Polylthia longifolia व pendula) | संपूर्ण महाराष्ट्र राज्य |
| ६. | | शेवगा *(Moringa oleifera)* | संपूर्ण महाराष्ट्र राज्य |
| ७. | | सिंदी *(Phoeni sylvestries)* | संपूर्ण महाराष्ट्र राज्य |
| ८. | | ऑरेंज *(Citrus aurantium)* | संपूर्ण महाराष्ट्र राज्य |
| ९. | | चिकू *(Achras zapota)* | संपूर्ण महाराष्ट्र राज्य |
| १०. | | भेंडी *(Thespesia populnea)* | संपूर्ण महाराष्ट्र राज्य |
| ११. | | अकेशीया *(Acacia mangium)* | संपूर्ण महाराष्ट्र राज्य |
| १२. | | पॉपलर *(Populas)* | संपूर्ण महाराष्ट्र राज्य |
| १३. | अधिसुचना टिआरएस-२००९/ प्र.क्र.६७/फ-९, दि. ९ ऑगस्ट २०१२ | डॅन्ड्रोकॅलमस स्ट्रिक्टस (खाजगी क्षेत्रातील) | संपूर्ण महाराष्ट्र राज्य (अमरावती, यवतमाळ, गोंदिया, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, ठाणे, नागपूर, नाशिक व रायगड या जिल्ह्यांची क्षेत्रे वगळून) |
| १४. | | बाम्बूसा बॅम्बोस (खाजगी क्षेत्रातील) | |
| १५. | पत्र क्र. संकिर्ण-२०१०/ प्र.क्र.११८/फ-९, दि. २७ सप्टेंबर २०१२ | खाजगी क्षेत्रावर उत्पादित होणारा लाख | भंडारा व गोंदिया जिल्ह्याकरिता |
| १६. | अधिसुचना क्र.एस,१०/२०१२/ प्र.क्र.२२६/फ-३, दि. ९ एप्रिल २०१३ | वनेत्तर जमिनीतील सुरु *(Casuarina equisetifolia)* | संपूर्ण महाराष्ट्र राज्य |
| १७. | अधिसुचना क्र. टिआरएस-२००९ /प्र.क्र.६७/फ-९, दि. २४ जुन २०१३ | (डॅन्ड्रोकॅलमस स्ट्रिक्टस व बाम्बूसा बाम्बू) यांच्याव्यतिरिक्त बाम्बूच्या सर्व प्रजातीं (वनेत्तर जमीनीवरील) | संपूर्ण महाराष्ट्र राज्य |



Scanned by CamScanner